अधिसुचना

गृह विभाग
मंत्रालय मुंबई ४०० ००३२
दि. १ जुलै २००६

क्रमांक-टिटीसी- ३६०६/४२७/प्र.क्र.५/पोल-३ भारतीय फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ (सन १९७४ चा २) मधील कलम (२) पोट कलम (एस) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि ते ज्या पर्यंत महाराष्ट्र राज्यात लागु होतात. त्या सर्व अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, या अधिसुचनेतील परिशिष्टातील स्तंभ २ मध्ये दर्शविण्यात आलेली सहा नवीन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत पोलीस ठाणी, ज्याचे कार्यक्षेत्र त्याच्या नावासमोर स्तंभ ३ मध्ये दर्शविलेले स्थानिक क्षेत्र व स्तंभ ४ मध्ये दर्शविलेले महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचे मंडळक्षेत्र आहे ती पोलीस ठाणी असल्याचे घोषीत करीत आहे.

परिशिष्ट

अ क्रं	पोलीस ठाण्यांचे नाव व स्थळ	महसुली जिल्हे / स्थानिक क्षेत्र	म.रा.वि.वि.मर्यादित यांनी निश्चित केलेली मंडळे
१.	म.रा.वि.वि. मर्या. पोलीस ठाणे कल्याण, स्थळ परिमंडळ कार्यालय, तेजश्री जहांगिर मैदान, कर्णिकरोड कल्याण	ठाणे, रायगड, रत्नागिरी, मुंबई, सिंधुदुर्ग	कल्याण (शहर), कल्याण (ग्रा) पेण, वसई ठाणे, भिवंडी, वाशी, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
२.	म.रा.वि.वि. मर्या. पोलीस ठाणे पुणे स्थळ परिमंडळ कार्यालय, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ पुणे	पुणे, केल्हापुर, सातारा, सांगली.	पुर्ण (ग्रा), गणेशखिंड, रास्ता पेठ, सातारा, कोल्हापुर व सांगली
३.	म.रा.वि.वि. मर्या पोलीस ठाणे नाशिक स्थळ परिमंडळ कार्यालय, विद्युतभवन, नाशिक रोड नाशिक	नाशिक, अहमदनगर, धुळे, जळगांव व नंदुरबार	नाशिक (शहर), नाशिक (ग्रा) जळगांव, धुळे व अहमदनगर
४.	म.रा.वि.वि. मर्या पोलीस ठाणे जालना, स्थळ परिमंडळ कार्यालय चाणक्य संकुल क्रं.२, कोचेरी रोड, जुने जालना, जालना	जालना, औरंगाबाद, परभणी, बुलढाणा, वाशिम, हिंगोली	जालना, परभणी, औरंगाबाद(शहर) औरंगाबाद (ग्रा), बुलढाणा व वाशीम विभाग
५.	म.रा.वि.वि. मर्या पोलीस ठाणे लातुर स्थळ परिमंडळ कार्यालय जुने पॉवर हाऊस, गंज गोलाई जवळ, साने गल्ली, लातुर	लातुर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, सोलापुर	लातुर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, सोलापुर
६.	म.रा.वि.वि. मर्या पोलीस ठाणे नागपुर स्थळ- शहर परिमंडळ कार्यालय प्रकाश भवन, लिंक रोड, सदर, नागपुर	नागपुर, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली, वर्धा, गोंदीया, अमरावती, अकाला, यवतमाळ	नागपुर (शहर), नागपुर (ग्रा), चंद्रपुर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, यवतमाळ, अकोला (वाशिम विभाग वगळुन)

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित पोलीस ठाणी भारतीय दंड संहिता १८६० (१८६० चा ४५) मधील प्रकरण १७ आणि विद्युत अधिनियम, २००३ (सन २००३ चा ३६) मधील कलम १३५ आणि १३८ मधील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या मालमत्तेच्या चोरीशी संबंधीत गुन्हयांची नोंदणी व अन्वेषण करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

सही/-

(अ.स.नाईकनवरे)

शासनाचे उप सचिव